Publication: Saamana
Date: 3/3/2020
Page: 9
Column: 7

सामना
मंगळवार,
दि. ३ मार्च २०२०

# अदानीच्या डहाणू वीज केंद्राला बेस्ट बॉयलरचा पुरस्कार

*अदानी* पॉवरच्या डहाणू येथील वीज केंद्राला 'बेस्ट बॉयलर युजर' हा पुरस्कार मिळाला आहे. राज्य सरकारच्या स्टीम बॉयलर संचालनालयाच्या वतीने औद्योगिक क्षेत्रात बॉयलरचा सुरक्षित आणि कार्यक्षमपणे वापर करणाऱ्या कंपन्यांना हा पुरस्कार दिला जातो. डहाणू औष्णीक वीज केंद्र सुरू झाल्यापासून म्हणजे गेल्या २५ वर्षांत बॉयलर निकामी होण्याचे प्रमाण अत्यल्प असल्याने वर्षानुवर्षे पूर्ण क्षमतेने वीजनिर्मिती सुरू आहे. अपघाताचे प्रमाण कमी, पर्यावरण, तंत्रज्ञानाच्या दृष्टीने सदर बॉयलर उत्तम ठरल्याने 'बेस्ट बॉयलर युजर'चा पुरस्कार राज्याचे कामगार व उत्पादन शुल्कमंत्री दिलीप वळसे-पाटील यांच्या हस्ते प्रदान केला.